# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक १३/०५/२०२६ (बुधवार)

## वाहन चोरीचा गुन्हा उघड, १ आरोपी अटक,

## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन नरखेड :— नागपुर ग्रमीण जिल्हयातील उघड न झालेलया गुन्हयांचा तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनिय बातमीदारामार्फत माहीती प्राप्त झाली की, अभिलेखावरील गुन्हेगार नितेश एकनाथ उईके, रा रोहाना ता नरखेड जि नागपुर याने पोलीस स्टेशन नरखेड हद्दीत वाहन चोरीचा गुन्हा केला आहे. मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने आरोपीचा शोध घेवुन तांत्रिक पुराव्याच्या आधारे दिनांक १३/०५/२०२६ रोजी नतेश एकनाथ उईके, वय ३८ वर्षे रा रोहाना ता नरखेड जि नागपुर याला गळपुरा चौक, काटोल येथुन मोटर सायकलसह ताब्यात घेतले. पोलीसांनी आरोपीकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता दिनांक २०/०४/२०२६ रोजी नरखेड येथुन कोर्टाच्या आवरातुन मोटर सायकल चोरी केल्याची माहीती दिली.

पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन एक पॅशन प्रो दुचाकी क्रं एम एच ४० ए वाय ५६४४ किंमती ३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीला अटक करण्यात आली असुन पुढील तपास नरखेड पोलीस करीत आहेत.

उघडकीस आणलेला गुन्हा

१) पोस्टे नरखेड अप.क्रमांक ३७५/२०२६ कलम ३०३(२) भान्यासं




गुन्हे उघड करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

# अवैधरीत्या विनापरवाना देशी व विदेशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हे नोंद, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन बेला :— दिनांक १२/०५/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गुप्त बामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, बेला हद्दीतील मौजा शेडेश्वर या गावात दोन इसम अवैधरीत्या दारूची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पथकाने मौजा शेडेश्वर येथे धाड टाकली असता **आरोपी नामे १) मारुती परसराम राऊत , वय ५० वर्ष, रा. शेडेश्वर ता. बेला हा अवैधरितया देशी दारू विक्री करीतांना मिळुन आला तसेच २) गंगाधर परसराम राऊत, वय ४६ वर्ष, रा. शेडेश्वर, त. बेला** हा अवैधरीत्या  विदेशी दारूची विक्री करतांना मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपी क्र. १) याचे ताब्यातून १) १२० देशी दारूच्या निपा किंमती ९६००/— रूपये आणि आरोपी क्र. २) याचे ताब्यातून १०२ देशी दारूच्या निपा किंमती ८१६०/— रूपये तसेच इंपेरीयल ब्ल्यु कंपनीच्या २२ विदेशी दारूच्या निपा किंमती ४८४०/— रूपये असा एकुण दोन्ही कारवाईतील किंमती २२,६००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपींविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हे दाखल केले आहे.**




कारावाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०८ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक १२/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** अंतर्गत देवलापार पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी १) जितेंद्र रामदास मेश्राम, वय ३८ वर्ष, रा. रामनगर देवलापार, ता. रामटेक हा मौजा टांगला येथे तसेच २) मनोहर तुळसीराम कुमरे वय ५८ वर्ष रा. देवलापार ता. रामटेक हा मौजा गुप्तगंगा देवस्थान परीसर येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. तसेच **पोलीस स्टेशन अरोली** अंतर्गत **निमखेडा येथे आरोपी १)** युगांत हिरालाल गडे, वय २८ वर्ष, रा. निमखेडा २) ऋषिकेश नंदकिशोर गुरव, वय २९ वर्ष, रा.

निमखेडा हे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत मौजा पारशिवनी कृषी उत्पन्न बाजार समीती जवळ पारशिवनी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी कलश सुमेश नंदेश्वर, वय २३ वर्ष, रा. माजरी, पार्वती नगर, कळमना, नागपुर जिल्हा नागपुर हा **सार्वजनिक ठिकाणी** अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत आरोपी मिथीलेश सुखलाल ठाकुर, वय ३६ वर्ष, रा. सरोदे नगर, सावनेर हा सरोदे नगर, पाण्याची टाकी सावनेर येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी रोशन बालकृष्णा ईरपाची, वय २५ वर्ष, रा. सेमरा, ता. सौसंर, जि. छिंदवाडा हा मौजा वाकी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत आरोपी राजेश ओकिल प्रधान, वय ३१ वर्ष, रा हिंगना, जि. नागपूर ह. मू. गोदावरी नगर, बोरी हा मौजा रूईखैरी वाय पॉईट येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०८ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## २ दुचाकी वाहन, ०१ मोबाईलसह एकुण ९५ हजार ५२० रूपयांचा मुद्देमाल जप्त,
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन खापा :— दिनांक १२/०५/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा लांबटपुरा खापा परिसरात जागेश्वर ठोसरे याने त्याचे घराचे मागील बाजुस ५२ ताशपत्त्यांचा जुगार भरविला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) देवीदास माणिक चौधरी, वय ४३ वर्ष, रा. वाकोडी याला** जागीच पकडले.

पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि ०१ अँडरॉइड मोबाईल किंमती १०,०००/—रूपये, विविध कंपन्यांचे एकुण ०२ मोटरसायकल किंमती ८०,०००/— रुपये, रोख रक्कम ५५००/—रूपये असा एकुण ९५,५२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद प्रकरणी आरोपी नामे १) देवीदास माणिक चौधरी, वय ४३ वर्ष, रा. वाकोडी , २)जागेश्वर ठोसरे, रा खापा ,३) हर्षल भासा आणि आरोपी क्र ४) रोशन या आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन खापा येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ३५ गुन्हे नोंद

दिनांक १२/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा व इतर साहित्य असा एकुण २४०७१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ३५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे ३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन मौदा** येथे ५ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे ५ गुन्हे नोंद आहे.

नमुद कारवाईत एकुण २७८ लिटर मोहाफुल गावठी दारू, ४२०० किलो मोहाफुल सडवा व इतर साहित्य, ३५५५० मिली देशी दारू तसेच असा एकुण २४०७१०/— रूपयांचा

मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने